# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

========================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना केवळ नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणे संभवते. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. बाकी घरच्या दारच्या सर्व प्रकारच्या संबंधामध्ये असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडून कालापव्यय होणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत त्रागा न करता मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून सतत नम्रतेचे आचरण कराल तरच सुखाचे होईल. “महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती “ हे संत तुकोबांचे वचन आहेच ! लहरी, चंचल स्वभावावर नियंत्रण हवेच. अकारण शत्रुत्व निर्माण होणार नाही याची काळजी घ्या. हर्षल - नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. त्यात आपल्या अयोग्य आचरणामुळे भर पडणार नाही; याची काळजी घ्या. कर्क या उच्च राशीतील गुरुमुळे या राशीच्या काही मंडळीचे स्थावर संपत्ती खरेदी-विक्रीबाबतचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. पण त्यामुळे प्रिय जनांमध्ये गैरसमज, वाद, भांडणे होणेही संभवते. जपा. कुसंगती व कुमार्गी मित्रांपा सून दूर राहा. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. ताप येणे, अपचन होणे, पोटाचे विकार बळावणे, मूत्राशयविकार होणे संभवते. जपा. वैवाहिक सुखासमाधानातही बाधा येणे संभवते श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता आहे. पण

मानसिक रोग तज्ञ , द्रव पदार्थ व्यापारी, वकिली सल्लागारी व्यवसाय, शैक्षणिक व्यवसाय, उच्च बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना आणि लोखंड, कोळसा व्यापारी यांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. दलाली, कमिशनवरील व्यवसाय सोडून अन्य भागीदारी व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती राहण्य ाची शक्यता जाणवते. अकारण भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. मुलांपैकी कोणाच्या आजारपणामुळे किंवा अन्य कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. शुक्राचा अनुकुलतेमुळे महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण महिन्याच्या उत्तरार्धातमनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. जीवनसाथीचे अनारोग्य किंवा दोघांतील वाद, मतभेद आदि कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभणेही कठीण होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णता विकार बळावून अनारोग्य होणे संभवते. अपघात भय आहेच. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मन:शांती देऊ शकेल.

(३) **मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकुल असला तरी गुरु-मंगळ, गुरु-हर्षलशुभ योगामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन , वैद्यकीय संशोधन , औषधी शास्त्रकार्यक्षेत्र असणारांना, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांनी हातचे सोडून नवे काही करण्याचा विचारही करू नये. रवि-राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य असले तरी गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थ ितीआटोक्यात राहील. मात्र शारीरिक-मानसिक अनारोग्याकडे लक्ष द्यावेच लागेल. विविध

कारणांनी अपेक्षित संतातिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. या राशीच्या काही मडळीना उष्णता विकारांचा तर काहीना रक्तविकार, हृदयविकार अशापैकी आजार त्रस्त करतील. काहीना अपप्रचाराचा त्राससहन करावा लागेल; तर काहींना चोरीमुळे किंवा अन्य कारणाने अर्थहानी सहन करावे लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील भांडणे, वाद, मतभेद अशापैकी कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारी व्यापार व्यवसाय असेल तर त्यात संशय, मतभेद गैरसमज अशापैकी कारणांनी अडथळे निर्म ाणहोणे संभवते. जपा. अध्यात्मिक उपासना कराल तर अपेक्षित मन:शांती मिळू शकेल.

**(४) कर्क** - संततिसुखाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध मनस्तापदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. सर्व प्रकारच्या आरोग्याच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. काहीना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल; तर काहीना आर्थिक हानीला सामोरे जावे लागेल. पण नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्ध अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्य ा व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. गुरु-शुक्र लाभ योगामुळे या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ, काहीना मानाच ेस्थान तर काहीना धनलाभ प्राप्त होण्याची शक्यता दिसते. तसेच गुरु - हर्षल शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. वैद्यकीय, फार्मसी , यांत्रिक तांत्रिकविषयाच े शिक्षण

घेत असणाऱ्या या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशमनाचे योग संभवतात. जलभय असल्याने जलप्रवास करू नका. श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. रवि - राहू - मंगळ - हर्षल - केतू व काही प्रमाणात गुरु ग्रह प्रतिकुल असल्याने आर्थिक समस्या, वित्तहानी, वाढता खर्च, अनारोग्य अशापैकी कारणांनी चिंताग्रस्त व्हाल. वाद, गैरसमज, भांडणे, राहत्या जागेची समस्या अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख, गृहसौख्य लाभण्याची शक्यता दिसत नाही. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी संततीसुख लाभणे कठीण दिसते. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवलेत तर विपरित काळावर मात करू शकाल. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार , ताप येणे, हृदयविकार बळावणे अशापैकी आजारांना निमंत्रणच दिले जाईल. जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाची उत्तम साथ असल्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. युवकांना उत्तम नोकरी किंवा नवे कार्यक्षेत्रमिळू शकेल. वकिली, सल्लागारीव्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. धनलाभ होईल. विचाराच्या तंद्रीत वाहने चालवू नका. अपघात भय आहे. जपा. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** पुढील महिन्याच्या प्रारंभापासून या राशीची मंडळी शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होणार आहेत. आता हा अखेरचा महिना मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून व्यतीत केलात तर पुढील काळाची अनुकुलता व सुखसमाधान सहज मिळवू शकाल. या महिन्याच्या काळात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना सहन कराव्या लागल्यामुळे शारीरिक - मानसिक अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. काही मंडळीना नेत्रविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. काहीना काल्पनिक चिंता त्रस्त करील. काहीना उगीचच आपल्याला कसला तरी आजार झाला असल्याची भावना होईल. महिन्याच्या पूर्वार्धात मनोबल उत्तम राहील पण नंतर कुटुंबात घडणाऱ्या अनिष्ट घटनांमुळे त्रस्त व्हाल. वैवाहिक जीवनातही जीवनसाथीच्या लहरी व विक्षिप्त आचरणामुळे, मतभेदांमुळे, वाद - भांडणामुळे सुखसमाधान मिळणे कठीण होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. कुलदैवताची उपासना मन:शांती देईल.

**(७) तुळा** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धचअनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत हळवे व भावनाशील झाले असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे थोडेही मनाविरुद्ध घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते.

मनस्ताप, चिंता, दैनदिन कार्यात येणाऱ्या अडचणी, अडथळे यांमुळे थकवा येईल व अनारोग्य होईल. उष्णता विकार, नेत्रविकार होण्याची शक्यता जाणवते. त्याशिवाय विविध कारणांनी कौटुंबिक सुखातही बाधा येणे संभवते. जपा. आर्थिक चिंता, फसवणूक यामुळेही त्रस्त व्हाल. अशा परिस्थितीत मन व विचारांवर ताबा ठेवून व सहनशील बनून आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवलेत होणारा मनस्ताप सुसह्य होईल. आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल आहे. महिन्याच्या उत्तरार्धात मन सशक्त बनेल, हिम्मत वाढेल व उमेद येईल. शिक्षणक्षेत्र , उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्र , वैद्यकीय क्षेत्र , यांत्रिक तांत्रिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षेत्र मिळेल. नोकरदार मंडळीच्या कामावर वरिष्ठ खूष होतील. या राशीच्या काहीना परदेशगमनाचे योग येतील. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मनावरील ताण हलका होईल. हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीचा जन्मजात स्वभावच अतिशय मानी, हटटी, संतापी, अहंकारी असा असतो. त्यात शनि ग्रहाच्या साडेसातीची भर; त्यामुळे सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांवर मात करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अकारण श्रम , दगदग होते आणि थकवा येतो. अनारोग्य होते. अर्थप्राप्तीसाठी खूप धडपड करावी लागते. त्यामुळेच उष्णता भडकून डोळे, घसा, मान, दात, दाढा यांचे दुखणे बळावते. जपा. मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण केले नाहीत तर कौटुंबिक सुख व गृहसौख्यावरही अनिष्ट परिणाम होईल. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना व स्वतंत्र व्यावसायिकांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे त्यांनीजे काय साधावयाचे ते

महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. त्याच काळात गुरु - शुक्र या शुभ ग्रहांची अनुकुलता असणार आहे. गुरु - हर्षलशुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण केतुमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काहीही कारणाने अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काहीना परदेशगमनाचे योग येतील. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. श्रद्धापूर ्वकश्रीगजाननाची उपासना करा.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय भावनाशील झाले असल्याची शक्यता जाणवते. त्यामुळे या महिन्य ातआहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणे शक्य दिसत नाही. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ - शुक्र प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. तेव्हा मन शांत ठेवा, अति विचार करू नका. सहनशील बना. तरच फारसे अनारोग्य होणार नाही. पण महिन्याचा पूर्वार्ध नोकरदार मंडळीना तसेच चिकित्सक बौद्धिक ,शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणारांना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांन ा अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्म , गुढविद्या अशा क्षेत्रात रस असणारांना काळ यशदायक व सुखदायक होईल. महिन्याच्या उत्तर ार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील अशांन ा अचानक धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. पण क ौटुंबिकसुख व गृहसौख्य या दृष्टीने काळ अनुकुल होण्यासाठी मौन व्रत धारण करा, जे जे घडेल ते सहन करा. तरच सुखाचे होईल. संततिविषयक

समस्येकडे लक्ष द्यावे लागेल. श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना काही बाबतीत महिन्याचा पूर्वार्ध तर काही बाबतीत महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल व मनस्ताप देणारा असा असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठाचा त्रास , मानहानी सहन करावी लागेलसे दिसते. घरात वडील माणसांचा विरोध सहन करावा लागेल. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य दिसते. पण गुरु-शुक्रामधील लाभ योगामुळे समाधान लाभेल. विवाहेच्छू युवक युवतीना विवाहयोग संभवतो. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळून येतील. काहींना प्रवासाचे योग येतील; तर काहीना आर्थिक लाभ होणे शक्य दिसते. या राशीच्या व्यापाऱ्याना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईलसे दिसते. गुरु-हर्षलशुभ योगामुळे उच्च चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. लाभस्था नी असलेल्या स्वराशीच्या मंगळामुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाः होणे शक्य दिसते. महिन्याच्या उत्तरार्ध नोकरदार मंडळीना वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना अनुकुल, सुखदायक व लाभदायक होईल. पण कलाकारांना अडचणी, अडथळयांना तोंड देत प्रगत ी साधावी लागेल. व्ययस्थानी गेलेल्या मंगळामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील जपा. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. नोकरीत

विरोधी परिस्थितीला तोंड द्यावे लागेल; तर स्वतंत्र व्यवसाय असणारांना अनेक अडचणी, अडथळे त्रस्त करतील. वाद, भांडणे होणे संभवते. नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हत ेहोण्यास वेळ लागणार नाही. सध्या या राशीच्या मंडळीचे मन फार हळवे झाले असावे, असे वाटते. पण बुद्धी मात्र अस्थिर, चंचल व थोडी विकृत झाली असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे अविचाराने खर्च व आचरण होत असावे. तसेच स्वभावही संतापी झाला असून बोलणे फटकळ होत असावे, असे वाटते. असे असेल तर मन:शांतीसाठी मौन व्रत धारण करा, मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून विपरीत काळाशी मुकाबला करा. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु - मंगळ शुभ योगामुळे यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, ओषध विक्रेते यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. काहीना दूरच्या प्रवासाचेयोग येतील. गुरु - शुक्राच्या अनुकुलतेने आरोग्य चांगले राहून मनोनुकुल घटना घडतील. जीवनसाथीच्या किंवा संततीच्या अनारोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असल्याची शक्यता जाणवते. त्यामुळे कोणी केलेला उपदेश वा धाक असह्य होत असेलसे दिसते. अशा परिस्थितीत चिंता, मनस्ताप यामुळे मनाची उलघाल होत असेल व गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. शिवाय जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनात सुखसमाधानही मिळत नसेल. अशा परिस्थितीत शारीरिक उष्णता भडकून पोटाचे अनारोग्य, मूत्राशयविकार अशा प्रकारचे आजार निर्माण होणे संभवते. जपा.

नोकरीतही विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण शुभ ग्रह गुरु-शुक्र अनुकुल असल्यामुळे मधून मधून मानोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात असह्य त्रास होईलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना अडचणी, अडथळे यांना तोंड देत वाटचाल करावी लागेल. पण बुध-शुक्राच्या अनुकुलतेने विविध प्रकारचे लाभे होणेही संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. नवे स्नेहसंबंध, प्रेमसंबंधनिर्माण होतील. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना व गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक असा सिद्ध होईल. शिवोपासना व गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**===000O000===**